दि. 24 जानेवारी 2014

# जनमत सर्वेक्षण काय संकेत देतात?

अरुण जेटली
विरोधी पक्षनेते (राज्यसभा)

2014 च्या आम निवडणुकांसंदर्भात दोन वेगवेगळ्या एजंसिंनी जनमत सर्वेक्षण केले. जागांसाठी या सर्वेक्षणात जे कयास लावण्यात आले आहेत त्यात अधिक विश्वास नाही आहे. खास करुन जेव्हा हे सर्वेक्षण निवडणुकीच्या आधी 3-4 महिने पहिले करण्यात आले आहेत. तरी सुद्धा ज्या एजंसिंकडून हे सर्वेक्षण करण्यात आले, त्यांची काही प्रमाणातच विश्वसनीयता आहे. असे मानले जाऊ शकते की, यावेळेला ते जनतेचा सध्याचा ट्रेंड पकडण्याचा प्रयत्न करित आहेत.
सर्वेक्षणातून असे संकेत मिळतात की, भाजपा सर्वात पुढे आहे. लोकसभा निवडणुकीत आतापर्यंत पक्षाने सर्वात अधिक 183 जागा मिळवल्या आहेत. वर्तमान संकेत देत आहेत की पक्ष स्वबळावर या आकड्याला पार करेल. वर्तमान सहयोगी खासकरुन शिवसेना आणि अकाली दल सुद्धा चांगले काम करत आहेत. असे वाटते की, कॉंग्रेस पक्षाला यादीत सर्वात खाली जागा मिळेल. 2014 मध्ये तिला दोन अंकी संख्येने जागा मिळतील. सर्वात पुढे असलेली आणि दुस-या नंबरच्या पक्षात बरीच तफावत असेल.
असे सुमारे 10 राजकीय पक्ष असतील ज्यांच्या जागांची संख्या 5 ते 25 दरम्यान असेल. या सर्व पक्षांची हात मिळवण्याची शक्यता फार कमी आहे. अण्णा द्रमुक आणि द्रमुक एकीकडे येऊ शकत नाहीत. तृणमूल कॉंग्रेस आणि वामपंथी एकत्र येऊ शकत नाहीत. बसपा आणि समाजवादी पक्ष एकत्र येऊ शकत नाहीत. भाजपा आणि एनडीच्या सहयोगी पक्षांना सोडून काही पक्षांना ज्यांना आपापल्या राज्यात गैर-भाजप आणि गैर वामपंथी स्थान मिळेल त्यांच्या जागांमध्ये पण वाढ होईल अशी अपेक्षा आहे. अण्णा द्रमुक ला अनेक जागा मिळतील. टीडीपी परत उभारी घेत आहे आणि आपली वोट बॅंक मजबूत करीत आहे. बीजद ने स्वतःला सांभाळून ठेवले आहे. टीएमसी सुध्दा आपली जागा वाढवत आहे. वायएसआर कॉंग्रेसमुळे जो उल्हास होता तो सुद्धा कमी झाला आहे. मात्र सीमांध क्षेत्रात त्यांच्या जागा वाढत आहेत.
जदयू ज्यांनी भाजपाबरोबरील 17 वर्षांच्या युतीनंतर भाजपा विरोधी पक्षाच्या रुपात स्थान घेतले आहे त्यांचे पतन होताना दिसत आहे. लोकसभेतील पराजय बिहार सरकारला कमजोर करु शकतात. युपीए त युती असलेले अर्थात नॅशनल कॉंफरंस आणि एनसीपीने आपापल्या राज्यात विरोधींपासून असलेले अंतर स्वीकारले आहे.
तामिळनाडू आणि ओडिसा मध्ये भाजपाच्या मतांमध्ये पर्याप्त वृद्धि झालेली आहे. आसाम मध्ये पक्षाच्या मतांमध्ये कोणताही फरक पडलेला नाही. आंध्र पदेश आणि पश्चिम बंगाल सारख्या राज्यांत पक्ष दोन आकड्यात पोचल्यासारखी वाटत आहे. उत्तरी आणि मध्य तथा पश्चिमी भारतातील राज्यात भाजपाची स्थिती मजबूत झाली आहे. या जनमत सर्वेक्षणात सर्वात महत्त्वपूर्ण गोष्ट समोर आली आहे की, पंतप्रधानांच्या रुपात श्री नरेंद्र मोदी यांची स्वीकार्यता प्रत्येक राज्यात भाजपा च्या मतांच्या तुलनेत सुमारे 15 ते 20 टक्के अधिक आहे. तामिळनाडूत 17 टक्के आणि ओरिसा मध्ये 25 टक्के मते हिस्सेदारीला आणि कसे न्यायोचित ठरवले जाऊ शकते.
तेव्हा सरकार कोण बनवेल? काय भाजपा आणि एनडीएच्या व्यतिरिक्त कोण आणखी मुकाबला करण्यायोग्य आहे का?
लहान पक्षांचे एक समूह बनवण्यासाठीचा रस्ता बनवण्याची संभावना कधी स्थिर सरकार बनवू शकत नाही. कोणत्याही परिस्थितीत त्यांची संख्या वाढणारी नाही. दोन अंकांवर येणारी कॉंग्रेस कोणत्या वैकल्पिक आघाडीच्याच मागे लागेल. ते आघाडीचे केंद्र बनू शकत नाही. निष्कर्ष ह्याच निघतो की, भाजपाच्या नेतृत्त्ववाली सरकार आणि एनडीए ही एक स्थायी सरकार देऊ शकते. या संकेतांना पाहता ते ग्रेटर एनडीएच्या बाजूने सरकेल ज्याची स्थापना वाजपेयीजी यांनी केली होती. अनेक पक्ष ज्यांनी मिळून ग्रेटर एनडीएची स्थापना केली ते चांगले करण्याच्या स्थितीत आहेत. ग्रेटर एनडीए वर्तमान एनडीए पक्षांच्या अतिरिक्त असला पाहिजे ज्यात क्षेत्रीय दल सुद्धा असतील जे त्यांच्या राज्यात गैर कॉंग्रेस पक्षाचे स्थान घेतील. याप्रकारची युती वास्तवतः भारताच्या

संघीय राजकारणाचे प्रतिनिधीत्त्व करेल.

निवडणुकीला लक्षात घेता निर्णायक नेतृत्त्व, अर्थव्यवस्थेत नवे प्राण टाकणे आणि भ्रष्टाचाराला हटवणे मुख्य मुद्दा दिसून येतो. या जनमत सर्वेक्षणातून संकेत मिळतात की स्थायी सरकारची स्थापना हा सुध्दा मुख्य मुद्दा असू शकेल जो लोकांचा लक्ष देण्याचा विषय आहे भाजपा आणि ग्रेटर एनडीएच्या व्यतिरिक्त आणखी कोण स्थायी सरकार प्रदान करु शकेल?